दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक २२६ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.११ नोव्हेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

### महाड शहरात भविष्यातील पूरसदृष्य परिस्थिती टाळण्यासाठी

# सावित्री नदीच्या पात्रातील वाळू उत्खननासंदर्भात अहवाल सादर करावा : ना.बाळासाहेब थोरात

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाड परिसरात भविष्यात पुरामुळे दुर्घटना तसेच वित्त आणि मनुष्यहानी होऊ नये यासाठी जलदगतीने कार्यवाही करणे गरजेचे आहे. सावित्री नदीच्या पात्रातील दगड, माती आणि वाळू उत्खनन करण्यासंदर्भात तेथील परिसराचे पर्यावरणीय दृष्टीकोनातून सर्वेक्षण करून तातडीने त्याचा अहवाल पर्यावरण विभागाच्या मान्यतेसह सादर करावा, गाळ काढण्याचे काम कालमर्यादेत पूर्ण करावे असे निर्देश महसुल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी दिले.

महसूल मंत्री श्री. थोरात यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात सावित्री नदीच्या पात्रातील वाळू-दगड उत्खननाबाबतच्या कामाबाबत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भविष्यातील मनुष्यहानी व वित्तहानी टाळण्यासाठीच्या दृष्टीने जलदगतीने कार्यवाही करण्याचे निर्देश महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी अधिका-यांना दिले. यावेळी बंदरे विकास विभागाचे मंत्री अस्लम शेख, माजी



आमदार हुस्नबानो खलीफे, महसुल विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ.नितीन करीर, पर्यावरण व वाताव-रणीय बदल विभागाचे संचालक श्री. टोके, मेरिटाईम बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अमित सैनी, कोकणचे विभागीय आयुक्त विलास पाटील हे उपस्थित होते. याचबरोबर पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगडचे जिल्हाधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

महसूलमंत्री श्री. थोरात म्हणाले, या वर्षी सावित्री नदीच्या पात्रात मोठ्या प्रमाणात दगड, माती, वाळूचा गाळ असल्याने तेथे पाणी साचून ते महाड शहरामध्ये जाते यामुळे मोठ्या प्रमाणात वित्त व मनुष्यहानी होते. भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी या भागाचे पर्यावरणीय दृष्टीकोनातून सर्वेक्षण करून त्याचा अहवाल सादर करावा. याचबरोबर गाळ उपसण्याच्या कामास गती द्यावी.

आपत्ती टाळण्यासाठी करण्यात येणाऱ्या या कामासाठी सर्व विभागांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवून व सहकार्याने काम करणे गरजेचे असल्याचेही मंत्री श्री. थोरात यांनी यावेळी सांगितले. नदी पात्रातील गाळ काढण्यासंदर्भात शासन सकारात्मक असल्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी तेथील स्थानिकांना सांगितले होते. या दृष्टीने कालबद्ध कार्यक्रम आखण्यात यावा, असेही मंत्री श्री. थोरात यांनी सांगितले.

# पनवेल नवीन कोर्ट परिसरातील वाहतूक कोंडीबाबत वाहतूक शाखेची कारवाई



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल नवीन कोर्ट परिसरात मोठ्या प्रमाणात दुचाकी तसेच चारचाकी, रिक्षा आदींमुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होऊन या भागातील रहिवाशांना नेहमीच त्रास झाला होता. या संदर्भात परिसरातील जागरूक नागरिकांनी पनवेल वाहतूक शाखेकडे तक्रार करताच अशा प्रकारांच्या वाहनांवर कारवाई करण्यास सुरवात झाल्याने येथील रहिवाशांनी समाधान व्यक्त केले आहे.

नवीन कोर्ट परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतुकीचे नियम न पाळता या ठिकाणी येणारे नागरिक आपली दुचाकी वाहने, चारचाकी वाहने, रिक्षा हि उभी करून जातात. त्याचा नाहक त्रास या भागातील स्थानिक रहिवाशांना होत होता. वेडीवाकडी वाहने उभी केल्यामुळे वाहतूक कोंडीही होत होती.

याबाबत या भागातील जागरूक नागरिकांनी पनवेल वाहतूक शाखेकडे तक्रारी केल्या. त्या तक्रारींच्या आधारे पनवेल वाहतूक शाखेने टोईंग गाडीच्या माध्यमातून या ठिकाणी नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यास सुरवात केली आहे.

याठिकाणी नो पार्कींगचे फलक लावूनही वाहनचालक या फलकाकडे दुर्लक्ष करून आपली वाहने त्याच ठिकाणी उभी करत असल्याने येथील स्थानिक रहिवाशांनी संताप व्यक्त केला आहे.

## संक्षिप्त...

### मुंबई महापालिकेच्या निर्वाचित सदस्य संख्या वाढीस मान्यता

**दै.रायगड नगरी । मुंबई**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नगरसेवकांची संख्या वाढविण्यास आज मंत्रिमंडळाने मान्यता दिली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते. त्यानुसार आता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निर्वाचित सदस्य-नगरसेवकांची संख्या २३६ अशी होणार आहे.

मुंबई महानगरपालिका अधिनियमातील (१८८८ चा ३) कलम ५ मध्ये महानगरपालिकेच्या निर्वाचित सदस्यांची संख्या २२७ इतकी आहे. ही संख्या २००१ च्या जनगणनेच्या आकडेवारी आधारे निश्चित केलेली आहे. २०११ च्या जनगणनेनंतर निर्वाचित सदस्यांच्या संख्येत बदल करण्यात आलेला नाही व ही सदस्य संख्या कायम राहीली. २०११ च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार २००१ ते २०११ या दशकात बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात लोकसंख्येमध्ये ३.८७ टक्के इतकी वाढ झाली आहे. लोकसंख्येमध्ये झालेली ही वाढ, वाढते नागरीकरण याबाबी विचारात घेऊन वाढीव प्रतिनिधीत्व निश्चित करणे आवश्यक होते.

त्यानुसार निर्वाचित सदस्यांची संख्या वाढविण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार निर्वाचित सदस्य म्हणजेच नगरसेवकांची संख्या २३६ अशी करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

# नेरळ-कळंब रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहनचालक संतप्त

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील महत्व-ाचा समजला जाणारा नेरळ-कळंब रस्ता खड्ड्यात हरवला आहे.गेली दोन वर्षे या रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहनचालक संतप्त झाले आहेत.त्यात शासनाची यंत्रणा या रस्त्याकडे लक्ष देत नसल्याने स्थानिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

नेरळ येथून मुरबाडकडे जाण्यासाठी महत्वाचा असलेला नेरळ-कळंब राज्यमार्ग रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ठेकेदारांना छुपी मदत केली जात असल्याने अल्पावधीत रस्त्याची अवस्था दयनीय झाली आहे.रस्त्यावर साडेतीन कोटी रुपये खर्चून अलिबागच्या एका ठेकेदार कंपनीने केलेले डांबरीकरण वर्षात उधळले आणि त्यामुळे हा रस्ता दोन तीन वर्षात खड्ड्यात हरवला आहे.अलिबाग येथील ठेकेदार कंपनीने घेतलेले या रस्त्याचे काम कर्जत तालुक्यातील स्थानिक ठेलेदाराने घेतले होते.त्या ठेकेदाराला कर्जत सार्वजनिक बांधकाम विभागाचा आशीर्वाद असल्याने रस्त्यावरील डांबर एका वर्षात निघून गेले.त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्याची दुरुस्ती करून घेण्याची खबरदारी देखील घेतली नाही आणि त्यामुळे रस्त्याची अवस्था बिकट झाली आहे. ठेकेदाराला वाचविणार्या सार्वजनिक बांधकाम विभागामुळे या रस्त्याचा वापर करणारे वाहनचालक यांच्या शरीराची हाडे एक झाली आहेत.त्यात नित्कृष्ठ दर्जाची कामे करणाऱ्या ठेकेदारामुळे शासनाचे साडे तीन कोटी रुपयांचा चुराडा झाला असून नेरळ पाडा रेल्वे गेट पासून कोदिवले गावापर्यंत या भागातील रस्त्यावर खड्डे आणि धूळ मातीचे रस्ता बनला आहे. तर पुढे पोही गावापर्यंत या रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाल्याने हा रस्ता वाहतूक करण्यायोग्य .../२



# मुख्यमंत्री उद्धव ठाकरे रुग्णालयात दाखल

**दै.रायगड नगरी । मुंबई**

गेल्या दोन वर्षांपासून आपण कोविडचा मुकाबला करतो आहोत. एकीकडे या विषाणूशी लढाई सुरू असतांना दुसरीकडं आपलं जीवनचक्र सुरू राहावं, राज्यातली विकास कामं सुरूच राहावीत म्हणून आम्ही सगळे कुठेही न थांबता सातत्यानं प्रयत्न करतोय. मान देखील वर करायला वेळ मिळत नव्हता, साहजिकच माझ्या मानेच्या दुखण्याकडे नाही म्हणलं तरी थोडंसं दुर्लक्ष झालं आणि मानेवर जो परिणाम व्हायचा तो झालाच अशा शब्दात मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी त्यांच्यावरील शारिरीक त्रासाबद्दल सांगितले आहे.



मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले की, मानेच्या या दुखण्यावर व्यवस्थित उपचार व्हावेत यादृष्टीनं डॉक्टरांनी सल्ला दिल्यावरून मी आज रुग्णालयात दाखल होणार असून दोन तीन दिवस तिथेच राहून योग्य ते उपचार घेणार आहे. आपले आशीर्वाद माझ्या पाठीशी आहेत, त्यामुळं लवकरच तब्येत बरी होईल अशी खात्री आहे असं त्यांनी सांगितले.

त्याचसोबत यानिमित्ताने एकच सांगायचं आहे. कोरोना लसींच्या बाबतीत आपण १० कोटींचा टप्पा ओलांडला असला तरी आपल्याला सर्वांना लसींचे दोन डोस घेणे अतिशय महत्वाचे आहे. आपल्या जीवनाला सुरक्षित ठेवण्यासाठी लगेचच जवळच्या केंद्रावर जाऊन लस घ्या एवढीच विनंती करतो असं आवाहन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्यातील जनतेला केले आहे.

### सिडकोच्या कोविड योध्दे आणि गणवेषधारी कर्मचारी विशेष गृहनिर्माण योजनेतील

# उपलब्ध घरांसाठी १५ नोव्हेंबर २०२१ रोजी संगणकीय सोडत काढण्यात येणार

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडको महामंडळाच्या कोविड योध्दे आणि गणवेषधारी कर्मचारी विशेष गृहनिर्माण योजनेतील उपलब्ध घरांसाठी १५ नोव्हेंबर २०२१ रोजी संगणकीय सोडत काढण्यात येणार आहे. ज्या अर्जदारांना सोडतीमध्ये घर प्राप्त झाले नाही, परंतु योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी ज्या अर्जदारांनी अनामत रक्कम भरली आहे अशा सर्व अर्जदारांना सोडत प्रक्रीयेद्वारे सदनिका अदा करण्यात येणार आहेत. यात प्रतिक्षा यादीवरील अर्जदारांचादेखील समावेश करण्यात येणार आहे.

कोविड-१९ महासाथीच्या काळात डॉक्टर, परिचारिका, आरोग्य व सफाई कर्मचारी, पोलीस आणि अन्य गणवेषधारी कर्मचाऱ्यांनी आपल्या प्राणांची पर्वा न करता, समाजाप्रति आपले कर्तव्य बजावत अनेकांचे प्राण वाचवले. त्यांच्या या कार्याप्रति कृतज्ञतेची भावना म्हणून सिडकोकडून, महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली १५ ऑगस्ट २०२१ रोजी कोविड योद्धे आणि गणवेषधारी कर्मचारी विशेष गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात आला. या योजने अंतर्गत नवी मुंबईच्या तळोजा, कळंबोली, खारघर, घणसोली आणि द्रोणागिरी या ५ नोडमध्ये एकूण ४,४८८ घरे (सदनिका) उपलब्ध करून देण्यात आली. एकूण ४,४८८ घरांपैकी १०८८ घरे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी तर उर्वरित ३४०० घरे ही सर्वसाधारण प्रवर्गाकरिता आहेत.

या योजनेकरीता पहिली संगणकीय सोडत २९ ऑक्टोबर २०२१ रोजी काढण्यात आली होती. उपलब्ध घरांसाठी आणि अनामत रकमेचा भरणा केलेल्या परंतु ज्यांना .../२

> सदर विशेष गृहनिर्माण योजनेची रचना अशा प्रकारे करण्यात आली होती की जरी अर्जदार प्रथम सोडतीत अयशस्वी ठरला तरी प्रत्येक अर्जदाराला उपलब्ध असलेल्या स्थळी सदनिका मिळेल. कोविड योद्धे आणि गणवेषधारी कर्मचारी विशेष गृहनिर्माण योजनेतील उपलब्ध घरांसाठी सोडत काढण्यात येणार असल्याने 'प्रत्येक अर्जदारास घर' या सिडकोने दिलेल्या वचनाची पूर्तता होणार आहे.
>
> **डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

# माणगांवमध्ये भरदिवसा चोरी; ५ लाखाहून अधिक किंमतीचा ऐवज घेऊन चोरटे फरार

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

मंगळवार दिनांक ९ नोव्हेंबर रोजी दुपारी एक ते सव्वाएक वाजताच्या सुमारास इशरत प्लाझा कचेरी रोड येथे विजय सत्वे यांच्या घरातून एकूण पाच लाख वीस हजार पन्नास रुपये किंमतीचा माल लुटून दोन अनोळखी इसम फरार झाले आहेत.

हे दोन चोरटे घराचा दरवाजा उघडा असल्याची संधी साधून घरात घुसले आणि मग २ लाख दहा हजार रुपयांचे ६ तोळे ५ ग्रॅम वजनाचे गंथन, अकरा हजार आठशे रुपयाच्या चार सोन्याच्या अंगठ्या, ४,८०० रुपयांच्या दोन मोत्यांच्या नथ, २११०० रुपयांचे ३ तोळ्याचे गंठण, १६५४०० रुपयांचे दोन हातातील बांगड्या, ४३००० रुपयांचे सोन्याचे लॉकेट, १४९५० रुपयांची कानातील कुडी, ७ हजार रुपयांची कानातील साखळी, २४ हजार रुपयांची कानातील सोन्याची रिंग, चांदीचे पैंजण पाच जोड असा एकूण ५, २०, ०५० रुपयांचा ऐवज घेऊन फरार झाल्याची तक्रार माणगांव पोलिस ठाणे येथे नोंदविण्यात आली आहे.

पोलिस उपविभागीय अधिकारी प्रविण पाटील यांनी घटना स्थळी भेट दिली. पुढिल तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक अश्वनाथ खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

# एसटीचा कारवाईचा बडगा ; ३७६ कर्मचारी निलंबित

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्य परिवहन महामंडळाचे (एसटी) राज्य शासनामध्ये विलीनीकरण करण्याच्या मागणीसाठी राज्यात विविध ठिकाणी एसटी कर्मचाऱ्यांचा संप सुरू आहे. न्यायालयाच्या आदेशानंतर राज्य सरकारने समिती नेमण्याबाबत अधिसूचना काढूनही एसटी संघटनांनी संप मागे घेतला नाही. अखेर मंगळवारी एसटी महामंडळाने कारवाईचा बडगा उगारत राज्यभरातील ४५ आगारांतील ३७६ कर्मचाऱ्यांचे निलंबन केले आहे.



दरम्यान, खासगी वाहनांना प्रवासी वाहतुकीसाठी परवानगी देण्याच्या राज्य शासनाच्या निर्णयाचा संपकरी कर्मचाऱ्यांनी विविध ठिकाणी मुंडण करीत निषेध केला.राज्याची जीवनवाहिनी म्हणून एसटी ओळखली जाते. ग्रामीण भागातील विशेषतः गाव-खेड्यातील प्रवासीवर्ग प्रवासासाठी एसटीवरच अवलंबून आहे.

एसटीचे राज्य सरकारमध्ये विलीनीकरण करण्यात यावे या आणि अन्य मागण्यांसाठी सुरू असलेल्या एसटी कामगारांच्या आंदोलनामुळे एसटीच्या राज्यभरातील २५० आगारांपैकी २४७ हून अधिक आगारांमधील वाहतूक यामुळे पूर्णपणे ठप्प झाली आहे. एसटी महामंडळाचे राज्य शासनात विलीनीकरण होत नाही, तोपर्यंत हे आंदोलन मागे घेणार नाही, अशी ठाम भूमिका एसटी कर्मचाऱ्यांनी घेतली आहे. न्यायालयानेही एसटी कर्मचाऱ्यांना संप मागे घेऊन कामावर हजर होण्याचे निर्देश दिले होते.

औद्योगिक न्यायालयाने आणि उच्च न्यायालयानेही कर्मचाऱ्यांचे हे आंदोलन चुकीचे असल्याचे म्हटले आहे. इतकेच नव्हे, तर कर्मचाऱ्यांनी न्यायालयाच्या आदेशाचा अवमान .../२

# उत्तर कोण देणार?

'आयपीएल आणि वर्ल्ड कप यांत अंतर होतेच कुठे? सातत्याने होत असलेल्या क्रिकेटमुळे, जैवसुरक्षित वातावरणात सतत राहावे लागल्यामुळे मीच थकलो होतो, तर खेळाडूंची काय अवस्था झाली असेल?' भारतीय संघाच्या प्रशिक्षकपदाच्या शेवटच्या दिवशी रवी शास्त्री यांनी व्यक्त केलेल्या या नाराजीमुळे पुन्हा एकदा 'आयपीएल' महत्त्वाची की देशासाठी खेळणे महत्त्वाचे, या चर्चेला तोंड फुटले आहे. यंदाच्या वर्ल्ड कपमध्ये आपली कामगिरी अपेक्षेप्रमाणे होणार नाही, याची काहीशी पूर्वकल्पना भारतीय संघास आली असावी का, असा प्रश्नही सामन्यानंतरच्या या वक्तव्यामुळे पडतो. करोनामुळे लांबलेली 'आयपीएल' ही वर्ल्ड कपपूर्वी होईल; त्यामुळे विलगीकरणाचा प्रश्न येणार नाही, हे साधे सोपे गणित मांडताना खेळाडूंच्या विश्रांतीचा विचारच केला गेला नाही. 'आयपीएल'पाठोपाठ झालेल्या वर्ल्ड कप स्पर्धेत भारतीय संघ अपयशी ठरण्याची ही काही पहिलीच वेळ नाही. इतिहासातून धडा शिकण्याची आपली तयारीच नाही, की भारतीय क्रिकेट बोर्डाचा आर्थिक डोलारा सांभाळण्यास अधिक प्राधान्य देण्यामुळे 'आयपीएल' संयोजनाकडे लक्ष दिले गेले आणि वर्ल्ड कपचा विचार दुय्यम ठरला? अति क्रिकेट, त्यातच जैवसुरक्षित वातावरण, विलगीकरण यामुळे खेळाडूंची मानसिक दमछाक झाली. या गोष्टीचा विचार इंग्लंड करीत होते. खेळाडूंना सातत्याने जैवसुरक्षित वातावरणात राहण्याचा त्रास होऊ नये, यासाठी स्वतंत्र संघासह रोटेशन पद्धतही ते वापरत होते. भारताकडे राखीव खेळाडू असल्याची केवळ चर्चाच झाली. सौरव गांगुली क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष असतानाही खेळाडू महत्त्वाच्या स्पर्धेपूर्वी ताजेतवाने असावेत, या गोष्टीकडे असेच दुर्लक्ष झाले होते. खेळाडूंच्या अपयशासाठी 'आयपीएल'ला जबाबदार धरणे, हा सोपा मार्ग झाला. विविध कारणांनी यापुढेही 'आयपीएल'चे प्रस्थ वाढणार आहे. वर्ल्ड कपमध्ये पाकिस्तानविरुद्धच्या पराभवानंतरही दोन संघांच्या खरेदीसाठी मोजण्यात आलेली बारा हजार कोटी रुपयांची रक्कम 'आयपीएल'ची वाढती लोकप्रियता दाखवते. खरेदीवर, संघाच्या प्रमोशनवर कोट्यवधीच्या रकमा खर्च करणारे, खेळाडूंकडून सर्वोत्तम कामगिरीची सातत्याने अपेक्षा बाळगणारच. या परिस्थितीत प्रश्न आहे ते नियोजनाचा. यापूर्वीही 'आयपीएल'पाठोपाठ झालेल्या वर्ल्ड कपमध्ये भारतीय संघ अपयशी ठरल्याचे, खेळाडू मानसिक, शारीरिक दृष्ट्या थकल्याचे आपण तीनदा पाहिले आहे. त्यावेळी भारतीय क्रिकेटची धुरा प्रशासकांकडे होती. यावेळी तर सौरव गांगुली अध्यक्ष होते. 'आयपीएल'मधील व्यावसायिक संघांची गणिते, त्यातील मानसिक; तसेच शारीरिक दमछाक त्यांनी स्वतः अनुभवली आहे. करोनामुळे लांबणीवर पडून 'आयपीएल' आणि वर्ल्ड कप लागोपाठ झाले, हे कारण देता येणार नाही. 'आयपीएल'चे आयोजन भारतीय क्रिकेट मंडळाचे होते आणि टी २० वर्ल्ड कप स्पर्धा संयुक्त अरब आमिरातीत झाली असली, तरी यजमान भारतीय बोर्डच होते. भारतीय क्रिकेट संघाचा कार्यक्रम ठरवताना पाकिस्तान आणि न्यूझीलंड यांच्यातील सामन्यात एका आठवड्याचा अवधी म्हणूनच देण्यात आला. इतर कोणत्याही संघास एवढा अवधी मिळाला नसेल. विराट कोहली आणि रवी शास्त्री त्यासाठी आग्रही होते. आता कोहली दोन भिन्न कर्णधारांचा प्रस्ताव ठेवताना, दोन भिन्न संघांबाबतचा संकेत देत आहे. हे कितपत प्रत्यक्षात येईल, हा प्रश्नच आहे. वर्ल्ड कपसारख्या महत्त्वाच्या स्पर्धेपूर्वी जोस बटलरने 'आयपीएल'मधून माघार घेतली होती, भारतीय खेळाडू हे करू शकतील? त्यांनी तसे ठरवले, तरी दोन-अडीच महिन्यांसाठी खेळाडूंची मालकी घेणारे संघ यास तयार होतील? 'आयपीएल'मधील वाघ वर्ल्ड कपमध्ये शेळी होतात; पण ही वेळ त्यांच्यावर कोण आणते, याचाही विचार करायला हवा. आयपीएल; तसेच क्रिकेटमधील साफसफाईसाठी नेमलेल्या लोढा समितीने 'आयपीएलनंतर पंधरा दिवस आंतरराष्ट्रीय क्रिकेट नको' अशी शिफारस केली होती; पण २०१३च्या लीगनंतर लगेचच झालेल्या 'चॅम्पियन्स करंडक' स्पर्धेत भारताने बाजी मारली आणि या शिफारसीचा विसर पडला. 'आयपीएल'च्या अंतिम टप्प्यात खेळाडूंची सर्वोत्तम कामगिरी होण्यासाठी संघाचे प्रयत्न असतात. 'आयपीएल'मध्ये चुकीतून सावरण्यास वाव मिळतो, तर वर्ल्ड कपमध्ये दोन सामन्यांनी भारताच्या वाटचालीचा निर्णय केला. 'आयपीएल'च्या दुसऱ्या टप्प्याने खेळाडू जास्त थकतील, त्यांना पुरेशी विश्रांती मिळणार नाही, हा विचार ना बोर्डाने केला ना त्याबाबत चर्चा करावी असे प्रशिक्षकांना वाटले. भारताचे आघाडीचे खेळाडू देशासाठी खेळताना ताजेतवाने राहावेत, यासाठी कोणतीही उपाययोजना करण्याचे बोर्डाला सुचले नाही. या परिस्थितीत देशासाठी खेळणे महत्त्वाचे की 'आयपीएल'चा पैसा महत्त्वाचा, या कपिलदेव यांच्यासह अनेकांनी विचारलेल्या प्रश्नाचे खरे उत्तर अनेकांना माहिती आहे. ते स्पष्टपणे कोण देणार, हाच प्रश्न आहे.

# विविध नागरी समस्यांवरुन शिवसेनेची सिडको कार्यालयावर धडक ; कामे न झाल्यास आंदोलन छेडणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली वसाहतीमध्ये अनेक नागरी समस्या असून या संदर्भात शिवसेनेसह इतर सामाजिक संस्था, संघटनांनी सिडकोच्या अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी करून सुद्धा त्या तक्रारींकडे दुर्लक्ष केले जात असून, आता सिडको अधिकाऱ्यानी कळंबोली जनतेचा अंत पाहू नये. येथील समस्यांबाबत अनेक वेळा पत्र व्यवहार करून सुद्धा सिडको प्रशासन लक्ष देत नाही. शेवटी संतप्त झालेल्या शिवसेना पदाधिकाऱ्यांनी सिडको अधिकाऱ्यांना घेराव घालून संपूर्ण शहर फिरवून समस्यांचा पाढा वाचला. यावेळी शिवसेना पदाधिकारी आक्रमक झाले होते. कळंबोली शिव-सेना शहरप्रमुख डी एन मिश्रा, गिरीश धुमाळ यांनी कार्यकारी अधिकारी विलास बनकर यांना फैलावर घेऊन तुमचे काम काय ? तुम्ही आल्यापासून काय काम केले. रस्ते खोदताना परवानगी घेतात त्यावेळी ते दुरुस्तीसाठी लागणारा खर्च आपल्याकडे जमा करतात. तो पैसा जातो कुठे. याचा लेखाजोखा मागितला.तर काही शिवसैनिकांनी बनकर हटाव कळंबोली बचाव असा सूर काढला.



शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली व पनवेल महानगर प्रमुख रामदास शेवाळे, पनवेल विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकुर यांच्या मार्गदर्शनाखाली, कळंबोली - रोडपाली येथील मूलभूत समस्या बाबत अनेकवेळा पत्र व्यवहार करण्यात आला. त्यात कळंबोली व रोडपाली परिसरातील रस्त्याच्या झालेल्या अत्यंत दुरावस्था. कळंबोली व रोडपाली परिसरातील रस्त्याच्या स्ट्रीट लाईट बाबत तसेच फुटपाथ वरील ड्रेनेजची झाकणे तुटून गेली असून आपघात होऊन जीवित हानी होण्याची दाट शक्यता आहे तेव्हा ती बसविण्यात यावी. पाण्याच्या अनियमित व दूषित पुरवठ्या. कळंबोली विभागात असलेल्या उद्यानांच्या दयनीय अवस्था झाली आहे. कळंबोली व रोडपाली विभागातील मुख्य रस्त्यावरील दुभाजकांवर वाढलेली झाडे, एम.एस.ई.बी तर्फे बसविण्यात आलेल्या ट्रान्सफॉर्मर भोवताली संरक्षक जाळी बसविण्यात याव्यात व महत्वाचे म्हणजे संपूर्ण कळंबोली शहराला वायूने भरलेल्या टँकरचा विळखा बसला आहे. त्यावर कारवाई करून शहराच्या प्रवेशावर हाईट गेट बसविण्यात यावेत. या समस्यांबाबत सिडकोला ३ ते ४ वेळा पक्षातर्फे निवेदने देण्यात आली होती पण याकडे सिडको प्रशासन जाणूनबुजून दुर्लक्ष करत आहे. तेव्हा सिडको आपलीच मालमत्ता आहे असा रुबाबात असलेल्या कळंबोली येथील मस्तावल बनलेल्या सिडको अधिका-या आज शिवसेना पदाधिका-यांनी घेराव घालून येत्या ८ ते १० दिवसात कामे झाली नाहीत तर सिडको विरोधात वसाहतीतील रहिवाशांना सोबत घेऊन शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. हे निवेदन कार्यकारी अभियंता, सिडको यांना देण्यात आले. या प्रसंगी शहर प्रमुख डी एन मिश्रा,शहर समन्वयक गिरीश दशरथ धुमाळ, उपशहर प्रमुख नारायण फडतरे,उपतालुका संघटक सौ टिया गिरीष धुमाळ,उपमहानगर समन्वयक प्रकाश चांदीवडे,शहर संघटक अरविंद कडव,विभाग प्रमुख महेश गुरव, आकाश शेलार,विभाग संघटक सुमित सूर्यवंशी,उपविभाग प्रमुख तेजस धावडे, तुषार निढाळकर, नागेश शेळके,उपशाखा प्रमुख मंगेश तलवार, उपविभाग संघटक अभिजित शिंदे, सत्यम शुक्ला, सौ मनीषा वच्कल, सौ नंदा जाधव, सौ रत्नमाला शिंदे, सौ पूनम गुप्ता इत्यादी पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

# कळंबोली मनसेच्या गड किल्ले उभारणी स्पर्धेला प्रतिसाद, चिमुकले पुरते भारावले

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

दीपावलीच्या ऊस्तवातील गडकिल्ले उभारण्याची संस्कृती २१ व्या शतकातही कायम टिकून रहावी. स्वतःच्या हा-ताने व कल्पकतेच्या कलाकुसरीने बाल कलाकारांनी मातीतून स्वहस्ते गडकिल्ल्यांची कलाकृती साकारावी व त्यांच्यातील कलागुणांना वाव मिळावा हा सामाजिक हेतू समोर ठेवून कळंबोलीतील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सचिन काळे यांनी गडकिल्ले उभारणी स्पर्धा दिवाळी उत्सवात आयोजित केली होती.या स्पर्धेला उत्तम प्रतिसाद मिळाला. गडकिल्ले उभारणी स्पर्धा - २०२१ या स्पर्धे मध्ये सहभागी ऐकून १० बाल मंडळे सहभागी झाली होती. मात्र सहभागी झालेल्या बाल कलाकार मंडळींचा उत्साह पाहता स्पर्धात्मक निकाल न देता सर्व सहभागी बाल कलाकार मित्र मंडळ यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. बाल कलाकारांनी स्वतःच्या मेहनतीने बनवलेल्या गड-किल्ले कलाकृतीला कौतुकाची थाप मिळाल्याने बाल कलाकारांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. मिळालेली ट्रॉफी व प्रमाणपत्र घेऊन हौसिंग सोसायटी मध्ये त्यांनी एकच कल्ला केल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे वसाहतीमधील नागरिकांनीही मनसेला धन्यवाद दिले आहेत.



दीपावलीच्या संगत रंगोली शहर मनसेचे जनसेवक महाराष्ट्र नवनिर्माण व्यापारी सेनेचे उपाध्यक्ष नितिन शिवदास काळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी गड किल्ले उभारणी स्पर्धा आयोजित केली होती या स्पर्धेत प्रथमच कळंबोली व साधून चांगला प्रतिसाद मिळाला. वसाहतींमधील गुरुसंकल्प सांस्कृतिक मित्र मंडळ, मातोश्री सोसायटी, संग्राम बाल मित्र मंडळ, अष्टविनायक सोसायटी, तुळजा भवानी मंदिर संस्था, गुरुविल्ला सोसायटी, तेजस ठाकुर मित्र समूह. सहयोग मित्र मंडळ, ई-१ स्टार मित्र मंडळ, मोरया मित्र मंडळ ही दहा मंडळे किल्ला बनवण्याची पद्धत सहभागी झाली होती. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व मंडळांच्या यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सोसायटी मध्ये जाऊन गौरवण्यात आले यावेळी नितिन शिवदास काळे, विक्रम बावडेकर (उपशहराध्यक्ष), सुरेश गोरड, भुषण तांबे, निखिल शिंदे, स्वप्निल घाडगे हे महाराष्ट्र सैनिक सहभागी उपस्थीत होते. गडकिल्ले स्पर्धेत सहभागी झालेल्या बालकलाकारांना मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. त्यावेळी त्यांच्या चेहऱ्यावरील गोड हास्य हीच स्पर्धेची पोच पावती मिळाल्याचे संयोजकांनी यावेळी सांगितले. पुढील वर्षी मोठा किल्ला करणार असल्याचे यावेळी बाल कलाकारांनी जाहीर करून टाकले. आपल्या राज्यातील मातीतील कला ही बालवयापासूनच मुलांच्या अंगी तेवत रहावी व बालकलाकाराची मातीशी नाळ जोडली जावी. गड किल्ले याची महती त्यांच्या जीवनात रुजावी यासाठीच गड किल्ले उभारणी स्पर्धा आयोजित केली जात असल्याचे आयोजक सचिन काळे यांनी सांगितले.

# राष्ट्रीय कुस्तीस्पर्धेसाठी महाराष्ट्रातून रुपेश पावशे यांची निवड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्पोर्ट्स फिजिकल फिटनेस ऑफ बोर्ड उत्तर प्रदेश व इंडिया यूनिव्हर्सिटी यांच्या वतीने उत्तर प्रदेश आगरा येथे १३ व १४ रोजी होणाऱ्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी महाराष्ट्रातून ८५ किलो वजनी गटातील स्पर्धेसाठी रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचा पैलवान व सी के टी कॉलेजचे क्रीडा शिक्षक रूपेश पावशे यांची स्पर्धक म्हणून निवड झाली आहे. त्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.



# नागोठणे विभाग राष्ट्रवादीचा काँग्रेसचा शुक्रवारी मेळावा

**दै.रायगड नगरी । वाकण**

नागोठणे जिल्हा परिषद मतदार संघातील प्रत्येक ग्रामपंचायत अंतर्गत आढावा घेण्यासाठी नागोठणे जवळील पिगोंडे ग्रामपंचायत कार्यालया शेजारील आंबेघर क्रिडांगणाच्या प्रांगणावर शुक्रवार दि. १२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता राष्ट्रवादी काँग्रेस नागोठणे विभाग व शहराच्या वतीने प्रमुख कार्यकर्त्यांचा भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्यास मार्गदर्शन करण्यासाठी खासदार सुनील तटकरे व तरुणांचे प्रेरणास्थान आमदार अनिकेतभाई तटकरे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस नागोठणे विभाग अध्यक्ष संतोषभाई कोळी यांनी दिली. गेल्या काही दिवसांपासून या मेळाव्याची जय्यत तयारी सुरु असून आगामी जिल्हा परिषद निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर खासदार सुनील तटकरे नागोठणे विभागातील आपल्या कार्यकर्त्यांना तसेच तरुण तडफदार आमदार व राष्ट्रवादी युवक काँग्रेस मधील युवकांचे स्फूर्तिस्थान आ. अनिकेतभाई तटकरे आपल्या युवक कार्यकर्त्यांना काय मार्गदर्शन करतात व कोणता कानमंत्र देतात याकडे सर्व नागोठणे विभागाचे लक्ष लागले आहे.

# पेणजवळ महिलेला उडवून कार चालकाचे पलायन

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण शहरातील शाहापाडा आदिवासी वाडी परिसरात भरधाव वेगात नेहमीच वाहनांची वर्दळ असते या आदिवासी वाडीवरील रस्त्यावरून आपल्या लहान बहिणीबरोबर विवाहित महिला जात असताना भरधाव वेगात आलेल्या एम एच ०६ ए एस २१९० या नंबरच्या व्हॅगनार कारचालकाने उडवण्याची घटना घडली असून मिनाक्षी वाघमारे असे विवाहित महिलेचे नाव असून दोन वर्षांपूर्वीच तिचा विवाह झाला असल्याचे समजते तर व्हॅगनार कारचालकाने महिलेला उडवुन ती व कार चालक जवळच असलेल्या खड्ड्यात पडली. अपघाताची खबर मिळताच पेण पोलीस ठाण्याचे पोलीस घटना स्थळी हजर झाले परंतु या आधी कार चालक याने पलायन केले होते. अपघातग्रस्त महिलेला ग्रामस्थांनी उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असून अधिक तपास पेण पोलीस करत आहेत.

# रायगडात आरोग्यदायी कंदमुळांचे भरघोस उत्पादन ; आदिवासींचा हक्काचा रोजगार

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागडसह जिल्ह्यातील आदिवासी बांधवांना आता जंगल, व रानावनात डोंगराळ भागात उपलब्द होणारी कंदमुळं जगण्याचा आधार बनतायेत. जंगल व डोंगर रांगांनी वेढलेल्या जिल्ह्यात सध्या आरोग्यदायी विविध कंदमुळांचे भरघोस उत्पादन मिळत आहे. सध्या सर्वच बाजारपेठेत कणक, करंदे, चाई, आळू, वरा, लोंढी व रताळी आदी कंदमुळांची विक्री आदिवासी बांधव करत आहेत. शिवाय मागील वर्षी पेक्षा भाव कमी आहेत. आदिवासींना यातून रोजगार देखील मिळत आहे.

यंदा सुधागडसह जिल्ह्यातील आदिवासी वाड्यांवर त्यामध्ये बहुतांश ठाकूरवाड्यांवर घराशेजारील परसबागेत, माळरानावर व डोंगरावर कंदमुळांचे मोठ्या प्रमाणत उत्प-ादन घेतले गेले आहे. परिणामी भरघोस उत्पादन आले आहे. त्यामुळे मागील वर्षी ६० ते ७० रुपये किलोने मिळणारे कणक, करंदे, चाई, वारा, आळू, लोंढी, रताळी आदी कंदमुळे यंदा अवघे ४० ते ५० रुपये किलोने मिळत आहेत. शिवाय मागील वर्षी कोरोनामुळे उत्पादन घेता आले नाही. तसेच बाजार देखील बंद होते. त्यामुळे मागील वर्षी किंमत अधिक होती असे करंजघर येथील कंदमुळे उत्पादक व विक्रेती लक्ष्मी लेंडी यांनी सांगितले. तर नागोठणे येथील दिलीप सोनावणे म्हणाले की या हंगामात मिळणारे हे विविध आरोग्यवर्धक कंदमुळे आवर्जून खातो. शिवाय मुंबई-पुणे आदी शहरात राहणाऱ्या नातेवाईकांना भेट म्हणून देखील अनेकजण देतात. शहरात ही कंदमुळे मोठ्या प्रमाणात उपलब्ध नसल्याने महाग मिळतात.

कंदमुळे साधारण चवीला गोड व रुचकर असतात. या कंदमुळांचे आयुर्वेदिक उपयोगही आहेत. यामुळे रक्तातील साखरेची पातळीही नियंत्रित राहते. शरीरात रक्ताची वाढ होते. शरीरातील कार्यशक्ती वाढते. विविध व्हिटॅमिन्स व कर्बोदके असतात. शरीराला ऊर्जा मिळते. अशा विविध दृष्टीने ही कंदमुळे गुणकारी आहेत. बहुतांश जण ही कंदमुळे उकडून तर काही जण भाजून खातात. तर काहीजण याची भाजी देखील बनवून खातात.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## नेरळ-कळंब रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहनचालक संतप्त

राहिला नाही.कोदिवले पासून पोही पर्यंतच्या भागातील रस्ता जागोजागी फुटला असून अपघात होण्याची भीती निर्माण झाली आहे.

त्यात या रस्त्यावरील उल्हासनदीवर असलेल्या पुलावरून पावसाळ्यात महापुराचे पाणी गेल्याने हा पूल देखील धोकादायक बनला आहे. तर पुलाच्या पुढे रस्त्यावरील खड्डे हे कोदिवले गाव येईपर्यंत रस्त्यातून वाहने कुठून न्यावीत असा प्रश्न निर्माण झाला आहे.वाहने जाण्यासाठी असलेल्या रस्त्यावर पायी चालता येईल अशी स्थिती या रस्त्याची स्थिती नाजूक बनली आहे.या रस्त्यावरून वाहतूक करणारे रिक्षा चालक यांना एक फेरी मारायला देखील नकोसा होते अशी भगवान जामघरे हे सांगतात. पण कुटुंब चालविण्यासाठी रिक्षा चालवावी लागते आणि म्हणून वाहनांची मोडतोड होत असताना देखील त्या खड्ड्यातून प्रवास करावा लागतो. या रस्त्यावरील धामोते, मालेगाव, दहिवली, वंजारपाडा,कोदिवले, बिरदिले, अवसरे, वरई, पोशिर या सर्व गावातील लोकांना रस्त्यातील वाहतूक नकोशी झाली आहे. तर मनीष राणे यांनी आम्हाला पोशिर गाव गाठेपर्यंत वाहने चालवणे हे जीवावर बेतल्यासारखे वाटते. तर बळीराम बाग फार्म हाऊस चालविणारे यशवंत भंवारे यांनी या रस्त्यामुळे आमचे पर्यटक कमी झाले असून आम्हाला पर्यटकांकडून रस्त्याबाबत कुरकुर ऐकून घ्यावी लागते. दत्तात्रय विरले यांनी या रस्त्याकडे सरकारी यंत्रणा लक्ष देत नसल्याने आम्हाला पाठीच्या आजारांना सामोरे जावे लागत आहे. आमच्या ग्रामस्थांची आणि वाहन चालक यांची दुःखे लोकप्रतिनिधी यांना कळणार आहेत काय?असा प्रश्न उपस्थित केला आहे. अशा संतप्त भावना या रस्त्याबद्दल सर्व वाहनचालक आणि स्थानिक यांच्या बनल्या असून सामाजिक कार्यकर्ते विजय हजारे यांनी या रस्त्याच्या कामासाठी तब्बल दोनवेळा उपोषणे केली आहेत.तरी देखील शासनाला जाग येत नसल्याने सर्व नाराजी व्यक्त करीत आहेत.

## उपलब्ध घरांसाठी १५ नोव्हेंबर २०२१ रोजी संगणकीय सोडत काढण्यात येणार

अद्याप घर वाटपित झालेले नाही अशा सर्व अर्जदारां करीता दुसरी संगणकीय सोडत उपरोक्त तारखेस काढण्यात येणार आहे. दुसऱ्या सोडतीमध्ये अर्जदारांनी ज्या ठिकाणास प्राधान्य दिले आहे त्या पेक्षा वेगळ्या ठिकाणचे घर त्यांना वाटपित केले जाऊ शकते, याची नोंद घेण्यात यावी. सदर सोडत पार पडल्यानंतर वाटपित झालेल्या घरांचा स्वीकार करण्यासाठी अर्जदारांना १५ दिवसांची मुदत देण्यात येणार आहे. सोडतीद्वारे उपलब्ध झालेली सदनिका स्वीकारणे अर्जदारास बंधनकारक असणार नाही. सोडतीनंतर यशस्वी अर्जदारांच्या नावांची यादी https://lottery.cidcoindia.com या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

## एसटीचा कारवाईचा बडगा ; ३७६ कर्मचारी निलंबित

केल्याप्रकरणी आंदोलक कर्मचाऱ्यांविरोधात अवमान याचिका दाखल करण्याच्या सूचनाही दिल्या होत्या. एसटी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे प्रवाशांची होणारी गैरसोय पाहता राज्य शासनाने प्रवाशांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी खासगी वाहनांना प्रवासी वाहतुकीसाठी परवानगी दिली आहे.

वारंवार बजावूनही व कर्मचाऱ्यांच्या मागण्या विचाराधीन असतानाही संप मागे न घेतल्याने उच्च न्यायालयाने एसटी कर्मचाऱ्यांना संप पुकारण्यास उद्युक्त करणाऱ्यांविरोधात अवमान याचिका दाखल करण्याची मुभा सोमवारी दिली. त्यानुसार, एसटी महामंडळ बुधवारी अवमान याचिका दाखल करण्याची शक्यता आहे.यामध्ये ८० हून अधिक एसटी कर्मचाऱ्यांचा आणि संपाची हाक देणाऱ्या संघटनेच्या अध्यक्षांचा समावेश असण्याची शक्यता आहे. याआधीही उच्च न्यायालयाने एसटी कर्मचाऱ्यांना संप मागे घेण्यास वारंवार बजावले. मात्र, अडेलतट्टू भूमिका घेत एसटी कर्मचाऱ्यांनी संप मागे घेण्यास नकार दिला.


**म्हसळा नगर पंचायत, म्हसळा**

**जाहीर नोटीस**

**जा.क्र.म्हनपं/जाहीर नोटीस/५६५४/२०२१ दिनांक : १०/११/२०२१**

महाराष्ट्र नगर परिषदा, म्हसळा नगर पंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ चे कलम १३० नुसार आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरणासंबंधाने म्हसळा नगरपंचायतीस प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह म्हसळा नगर पंचायतीकडे लेखी स्वरुपात हरकती नोंदवावी. अन्यथा कर वसुलीच्या सोईसाठी सदर हस्तांतरण करून नगरपंचायत दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | अनुसूची | अनुसूची पुस्तकातील क्रमांक मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे वर्णन | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नांव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | १७९६ पैकी | दिघी रोड | आर.सी.सी. पद्धतीत बांधलेली इमारत पहिला मजला फ्लॅट नं.१०४, १०५ | इकबाल इस्माईल कादिरी | मुसरत इकबाल कादिरी<br>शेहजाद इकबाल कादिरी<br>इकराम उल हल इकबाल कादिरी |
| २ | ३ | ६४ | कुंभारवाडा म्हसळा | कमर्शियल/कौलारु सिमेंट रेतीत बांधलेले घर | शकुंतला विष्णू सावंत | शरद विष्णू सावंत<br>उदय विष्णू सावंत<br>नितीन विष्णू सावंत<br>संतोष विष्णू सावंत<br>शोभना शशिकांत कदम |
| ३ | २ | ५६० पैकी | दिघी रोड | कमर्शियल/आर.सी.सी.पद्धतीत G+२ ची इमारत तळमजला गाळा नं.४ | अब्दुल शकुर मुजफ्फर घनसार | दिलीप गणपत जाधव |
| ४ | २ | १९१५ पैकी | फातिमा मेन्शन | फिरोज अपार्टमेंट आर.सी.सी. पद्धतीत बांधलेली इमारत पहिला मजला फ्लॅट नं.१०१ | अब्दुल अजिज अमानुल्ला चोगले | सायरा नसीम खान |
| ५ | २ | १६८९ पैकी | पाभरा फाटा मशिदी जवळ | कमर्शियल सनाबील अपार्टमेंट आर.सी.सी. पद्धतीत बांधलेली इमारत तळमजला गाळा नं.३ | सऊद शाहनवाज उभारे | रुकसाना हसन वस्ता |
| ६ | २ | ८६५ पैकी | कुंभारवाडा | आर.सी.सी.पद्धतीत G+२ ची इमारत दुसरा मजला फ्लॅट नं.२०३ | नासीर हाजीमिया पटेल | अली मोहम्मद फकीह |
| ७ | २ | ५१ | कुंभारवाडा | कौलारु सिमेंट रेतीत बांधलेले घर | शमसुन्निसा अ.सत्तार दरोगे | शाहीन अ.सत्तार दरोगे |

सही/-
मुख्याधिकारी
म्हसळा नगरपंचायत


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अँड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## दोन घरफोडीत लाखोचा ऐवज लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील आसुडगाव परिसराजवळ असलेल्या दोन घरफोडीत लाखो रुपये किंमतीचा ऐवज लंपास झाल्याची घटना घडली आहे.

दिवाळी सणानिमित्त आसुडगाव येथे राहणाऱ्या मुक्ता बोकडे या करंजाडे येथे मुलाकडे गेल्या होत्या. त्यांचे घर बंद असल्याचे पाहून अज्ञात चोरट्याने घरफोडीमध्ये दागिने व रोख रक्कम लंपास केली. त्याचप्रमाणे त्याच इमारतीमध्ये राहणारे गणेश गायकवाड यांच्या घरामध्ये सुद्धा अशाच प्रकारे घरफोडी करून ऐवज लंपास केला. या दोन्ही घरफोडीत जवळपास २ लाख ७५ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरीस गेल्याने याबाबतची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## विवाहिता बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या घरात कोणास काही एक न सांगता एक विवाहिता कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

राजेश्री तानाजी नागरपोळे (३० रा.सेक्टर नं.६, करंजाडे) ही राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता कुठेतरी निघून गेली आहे. तिची उंची ५ फुट ३ इंच, डोक्याचे केस लांब, चेहरा उभट, नाक सरळ, गळ्यात मंगळसुत्र, डाव्या हाताच्या तळव्याला भाजल्याची निशाणी आहे. डाव्या खांद्यावर तिळ आहे.

## जिटीआय अंतर्गत कामगार संघटनेच्या अध्यक्षपदी मिलिंद पाटील

**दै.रायगड नगरी । उरण**

जिटीआय अंतर्गत कामगार संघटनेच्या निवडणुकीत कामगारांनी पुन्हा एकदा चालू कार्यकारणीला निवडून दिले आहे.जीटीआय अंतर्गत कामगार संघटनेची निवडणूक १ नोव्हेंबर २०२१ रोजी झाली असून या निवडणुकीत कामगारांनी पुन्हा एकदा चालू कार्यकारणी वर विश्वास टाकत चालू कार्यकारणीला निवडून दिले आहे.

संघटनेच्या अध्यक्षपदी –मिलिंद रमाकांत पाटील (बोकडवीरा ), जनरल सेक्रेटरी –आशिष अशोक कडू (सोनारी ), उपाध्यक्ष –राजाराम वामन म्हात्रे (जासई ), खजिनदार –समीर म्हात्रे (गव्हाण ), सहसेक्रेटरी – संजय मदन केणी (चिंचपाडा ) यांची निवड या निवडणुकीत झाली आहे. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे सर्व कामगारांनी अभिनंदन करत त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# मरणाच्या दारात असलेल्या जन्मदात्या पित्याचे मुलीने प्राण वाचविले

**दै.रायगड नगरी । उरण**

आजकालच्या युगात बापाच्या जमिनीतून हिस्सा मागणाऱ्या सासुरवाशिणी मुली आपण नेहमीच बघत असतो.पण मरणाच्या दारात असणाऱ्या जन्मदात्या पित्याचे प्राण वाचविण्यासाठी स्वतःचा जीव धोक्यात घालणाऱ्या मुली खूप कमी बघायला मिळतात. अशीच एक सासुरवाशीण मुलगी चिरनेर गाव–ातील अक्षता ( गँबी) प्रशांत खारपाटील हिने आपल्या जन्मदात्या पित्याला मरणाच्या दारातून बाहेर काढण्यासाठी चक्क आपला काळीज (लिव्हर) देऊन जीवनदान देण्याचे काम केले. आणि समाजापुढे एक आदर्श निर्माण केला आहे.



रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य तथा उरण पंचायत समितीचे माजी उपसभापती कै.काळूराम धाकू खारपाटील यांचे कनिष्ठ चिरंजीव प्रशांत काळूराम खारपाटील(४८) यांना कोरोनाच्या संकटात लिव्हर सिरॉंसीन हा आजार जडला, त्यांना लिव्हर ट्रान्सप्लांटची गरज आहे.अशी माहिती नवीमुंबई येथील अपोलो रुग्णालयातील डॉक्टरांनी त्यांच्या कुटुंबियांना सहा महिन्यांपूर्वी दिली.त्यामुळे कोरोनाच्या पार्श्र्वभूमीवर खारपाटील कुटुंबियांचा आधारस्तंभ असणाऱ्या प्रशांत याचे प्राण कोण वाचविणार असा गंभीर प्रश्न प्रशांत यांच्या कुटुंबियांसमोर निर्माण झाला होता.

आपला जन्मदाता पिता आता मरणा असा विचार करून प्रशांत खारपाटील यांची जेष्ठ कन्या अक्षता हिने आपला लिव्हर देण्याची इच्छा कुटुंबियांसमोर व डॉक्टरांजवळ व्यक्त केली.यावेळी अक्षता चे मनोबल वाढवण्यासाठी व आपल्या सासऱ्याचे प्राण वाचविण्यासाठी अक्षताचे पती पंकज प्रेमनाथ पाटील यांनी तू तूझ्या जन्मदात्या पित्याला बिनधास्त पणे तूझे लिव्हर दे मी तूझ्या मागे खंबीरपणे उभा आहे.असा विश्वास अक्षताला चक्क पतीने दिला. अक्षताने देवू केलेल्या लिव्हरमुळे मुंबई –परेल येथील ग्लोबल रुग्णालयातील डॉक्टर रवि मोहंका व त्यांच्या पुर्ण टीमच्या बारा तासांच्या अथक प्रयत्नाने प्रशांत यांच्या वर नूकताच यशस्वीरित्या शस्त्रक्रिया पार पडली.

आज प्रशांत व त्यांची मूलगी अक्षता हे दोन्ही बाप लेक सुखरूप आपल्या घरी परतले आहेत. त्यामुळे अक्षता( गँबी) सारखी कन्या व पंकज सारखा जावई सर्वांना मिळावी अशी प्रार्थना मरणाच्या दारातून बाहेर आलेल्या प्रशांत ने महागणपती चरणी व्यक्त केली.तसेच कोरोनाच्या संकटात ही गेली एक वर्ष परिश्रम घेणारी त्यांची पत्नी आशा,दुसरी कन्या सुकन्या तीचे पती तेजस मारुती पाटील आणि चिरंजीव साईराज तसेच स्वतःचा जीव धोक्यात घालून लिव्हर देणाऱ्या अक्षता (गँबी) यांचा आदर्श प्रत्येकांनी घेऊन आप आपल्या जन्मदात्या आई वडिलांचा तिरस्कार न करता संकटात सापडलेल्या आपल्या आई वडिलांना सहकार्य करावे, असे उद्गार शेवटी पुनर्जन्म मिळालेल्या प्रशांत काळूराम खारपाटील यांनी व्यक्त केला आहे.

प्रशांत खारपाटील या रुग्णांला लिव्हर मिळाले नसते तर ते जगू शकले नसते लिव्हर देणाचे काम त्यांच्या मूलीनी केले त्यामुळे अक्षता ( गँबी) सारखी कन्या व पंकज सारखा जावई सर्वांना मिळावा अशी प्रतिक्रिया ग्लोबल रुग्णालयातील डॉक्टर रवि मोहंका यांनी व्यक्त केली.

# वाहतूक शाखेचे विना हेल्मेट चालकविरोधात धडक कारवाई

## आठवड्याभरात ८४८८ विना हेल्मेट मोटारसायकल चालकावर कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई वाहतूक शाखेने विना हेल्मेट दुचाकी चालविणाऱ्या चालकावर तसेच विना हेल्मेट दुचाकीवर मागे बसणाऱ्या व्यक्तीं विरोधात विशेष मोहीम राबवून त्यांच्यावर धडक कारवाईला सुरुवात केली आहे. त्यानुसार वाहतूक शाखेने २९ ऑक्टोबर ते ८ नोव्हेंबर दरम्यान नवी मुंबई पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत विशेष मोहिमेद्वारे एकूण ८४८८ विना हेल्मेट दुचाकी चालविणाऱ्या चालकावर तसेच विना हेल्मेट दुचाकीवर मागे बसणाऱ्या व्यक्तींवर कारवाई केली आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत दुचाकी वाहनांच्या अपघातांत तसेच त्यातील मृतामध्ये वाढ होत असल्याचे आढळून आले आहे. यातील बहुतांश अपघात हे हेल्मेट न घातल्यामुळे झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे दुचाकी वर पाठीमागे बसणाऱ्या व्यक्तीला सुद्धा हेल्मेट घालणे गरजेचे झाले आहे. असे असतानाही अनेक दुचाकी चालक हेल्मेट घालत नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे नवी मुंबई वाहतूक शाखेने विना हेल्मेट दुचाकी चालविणाऱ्या चालकावर २९ ऑक्टोबर पासून विशेष मोहिम सुरु केली आहे. या मोहिमे दरम्यान विना हेल्मेट दुचाकीवर मागे बसणाऱ्या व्यक्तींवर देखील कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार २९ ऑक्टोबर रोजी १३०० दुचाकीस्वारांवर, शनिवारी ३० ऑक्टोबर २१००, ३१ ऑक्टोबर रोजी १५००, १ नोव्हेंबर १३००, २ नोव्हेंबर १३९७ तर ८ नोव्हेंबर रोजी ८९१ अशा एकूण ८४८८ दुचाकीस्वारांवर नवी मुंबई वाहतूक पोलिसांनी कारवाई केली आहे. या कारवाईत विना हेल्मेट दुचाकीवर मागे बसणाऱ्या व्यक्तींवर देखील कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, नवी मुंबई पोलिस आयुक्तालय हद्दीत दुचाकी चालविताना चालकाने आणि दुचाकीवराबरोबर मागे बसलेल्या व्यक्तीने डोक्यावर हेल्मेट घालून सुरक्षित प्रवासांसाठी वाहतूक पोलिसांना सहकार्य करावे असे आवाहन नवी मुंबई वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त पुरषोत्तम कराड यांनी केले आहे.

# रायगड जिल्हा ओबीसी अध्यक्षपदी उमेश भोईर



**दै.रायगड नगरी । उरण**

कॉंग्रेस पक्ष मजबूत, सक्षम करण्यासाठी संघटनात्मक दृष्ट्या विविध विभागाशी संबंधित मोर्चेबांधणी करण्यात आली असून कॉंग्रेस पक्षाचा तळागाळात प्रचार, प्रसार करण्यासाठी रायगड जिल्हा ओबीसी सेलच्या अध्यक्षपदी उरण तालुक्यातील कळंबुसरे येथील रहिवासी तथा कॉंग्रेसचे एकनिष्ठ कट्टर कार्यकर्ते उमेश भोईर यांची निवड करण्यात आली आहे.

उमेश चावजी भोईर हे कॉंग्रेसचे एक निष्ठ कार्यकर्ते असून त्यांनी यापूर्वी कोप्रोली पूर्व विभाग अध्यक्ष, उरण तालुका ओबीसी विभाग अध्यक्ष, कॉंग्रेस सदस्य उरण, तालुका कॉंग्रेस सेवादल अध्यक्ष म्हणून काम केले आहे. सध्या उमेश भोईर हे उरण तालुक्यातील कलंबुसरे ग्रामपंचायतचे सदस्य म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या या सर्व कार्याची दखल घेत त्यांची नियुक्ती रायगड जिल्ह्याच्या ओबीसी विभागाच्या जिल्हाध्यक्षपदी करण्यात आली आहे.रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, तालुकाध्यक्ष जे डी जोशी, उरण तालुका सेवादल अध्यक्ष कमळाकर घरत, उरण तालुका कॉंग्रेस सेवादल अध्यक्ष जयवंती गोंधळी, उपाध्यक्ष रामकृष्ण म्हात्रे, उपाध्यक्ष जयवंत पडते,अध्यक्ष सदानंद पाटील, अध्यक्ष भालचंद्र घरत, शहर सेवादल महिला अध्यक्ष चंदा मेवाती, केगाव अध्यक्ष रेखा धनसरे, उरण तालुका कॉंग्रेस उपाध्यक्ष सुनील काठे, महालन विभागीय अध्यक्ष जी डी पाटील आदी मान्यवरांनी त्यांचे गुलाबपुष्प देऊन, मिठाई वाटप करून त्यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचा भूमीपूजन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

चिंचवण गावासाठी आमदार बाळाराम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल पंचायत समिती माजी सभापती काशिनाथ पाटील यांच्या प्रयत्नातून रायगड जिल्हा नियोजन समितीमार्फत चिंचवण गावात रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचा भूमीपूजन पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती व रायगड जिल्हा परिषदेचे सदस्य राम भोईर यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास सांगूर्ली ग्रामपंचायत सरपंच पद्माकर कातकरी, उपसरपंच वसंत पाटील, शेकाप जेष्ठ नेते महादेव पाटील, माजी उपसरपंच सचिन खुटले, उद्योगपती श्याम ठोंबरे, पुरोगामी युवक संघटना पनवेल तालुका उपाध्यक्ष अमित भोईर, सुनील म्हसकर, सदानंद खुटले, नरेश पाटील, भास्कर पाटील, जगदीश पाटील, काशिनाथ खुटले, केशव ठोंबरे,शिवाजी म्हात्रे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, १) श्रीमती.इंदुमती एकनाथ तारेकर २) श्री.राजेंद्र एकनाथ तारेकर, ३) श्री.ज्ञानेश्वर एकनाथ तारेकर, ४) श्रीमती.नंदा रमाकांत पाटील, ५) श्रीमती. लक्ष्मी गजानन म्हात्रे रा.पारगाव, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भूखंडाचे वाटप झालेले आहे. सदर भूखंड हे वर उल्लेख केलेले शेतकरी यांच्या संपादीत जमिनीच्या मोबदल्यात साडेबावीस टक्के योजनेंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबई कडून खालीलप्रमाणे पात्रता मंजूर होवून करारनामा झाला आहे. त्याप्रमाणे वर नमूद शेतकरी खाली वर्णन केलेला भूखंड त्रिपक्षीय करारनामा / हस्तांतरण करण्याचे व विकत देण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**
**सिडको फाईल क्रमांक** PAD-34

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| पुष्पक (दापोली) | ७ | १०६ | ११५० चौ.मी. |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लीज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/–**
**ॲड.सुजाता जो. पाटील**
**विसावा को.ऑप.हौ.सोसायटी,**
**प्लॉट नं.ई १२४/१३, सेक्टर १२,**
**खारघर, नवी मुंबई–४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**

अर्जदारतर्फे वकील
श्री.किरण बाळकृष्ण भगत

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.पनवेल यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज नं.४३६/२०२१
ने.ता.२१/१२/२०२१

श्री.अक्षय संदीप यादव
वय : २३ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.गावदेवी अपार्टमेंट जवळ, घरत हाऊस,
गावदेवी मंदिरामागे, बेहेरे गल्ली,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
पनवेल शहर महानगरपालिका
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाले

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्यापेक्षा सदर अर्जदार यांचे आजोबा रामचंद्र दत्तू यादव हे दि.३०/११/२००५ रोजी मौजे : रा.गावदेवी अपार्टमेंट जवळ, घरत हाऊस, गावदेवी मंदिरामागे, बेहेरे गल्ली, पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी मयत झाला आहे. सदर अर्जदाराने सदर मयताची नोंद होणेकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. यांचे न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहू अर्जदार यांचे आजोबा रामचंद्र दत्तू यादव हे वर नमूद ठिकाणी मयत झाले आहेत किंवा कसे? हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याचे आत, त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय सदरहू अर्जदार यांचेकडून लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीचे मृत्यूची नोंदणी करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१० माहे ११ सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल १) श्रीमती.संगीता जितेंद्र पाटील रा.ए.एल.६/५/१, सेक्टर ५, जवळ सिद्धीविनायक मंदिर, ऐरोली मुंबई–४००७०८. खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमूद असलेल्या मालकांकडून कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात खालील नमूद पत्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमीन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे : तांबस, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १) श्री.भगवान नारायण गोळेकर | १२ | ८ | ०–९४–०० पैकी ०–१८–०० | १.१५ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
**कार्यालयीन पत्ता : मु.उक्रुळ, पो.चिंचवली ता.कर्जत, जि.रायगड.४१०२०१**

**सही/–**
**ॲड.जयेश संभाजी म्हसे**
**दिनांक : ११/११/२०२१**
**मो.नं.९०२८९८२२७७**

ए.एम.मुजावर साहेब
वकील : अमित येवले

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.सो.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ / व.स्तर पनवेल यांच्या न्यायालयात
चौ.अर्ज नं.६५५/२०२१
नि.नं.७
ने.ता.०८/१२/२०२१

१) श्रीमती.सुरेखा विलास कांबळे
२) कु.सौरभ विलास कांबळे
३) कु.विद्या विलास कांबळे
४) कु.प्रिया विलास कांबळे
सर्व रा.सदनिका नं.१०३, श्री सिद्धनाथ को.ऑ.हौ.सो.,
प्लॉट नं.२७, सेक्टर १ ई, कळंबोली, ता.पनवेल,
जि.रायगड, नवी मुंबई–४१०२१८ — अर्जदार

वरील अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील मयत श्री.विलास गोरखनाथ कांबळे, रा.सदनिका नं.१०३, श्री सिद्धनाथ को.ऑ. हौ.सो., प्लॉट नं.२७, सेक्टर १ ई, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड, नवी मुंबई–४१०२१८ यांचे दि.०९/०४/२०१८ रोजी किंवा त्या सुमारास कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झाले. सदर मयताचे नावे असलेली मिळकत खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**सदनिका नं.१०३, पहिला मजला,**
**श्री सिद्धनाथ को.ऑ.हौ.सो.लि.,**
**प्लॉट नं.२७, सेक्टर १ ई, कळंबोली, ता.पनवेल,**
**जि.रायगड, नवी मुंबई ४१०२१८**
**मुल्य रु.२,९७,८५०/–**

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदारांनी वारसदाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारसदाखल्याबाबत कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न घेतल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.३०/११/२०२१ रोजी माझ्या सहीने दिले.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

सो.ए.एम.मुजावर साहेब
ॲड.विश्वास अवघडे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज वरिष्ठ स्तर साहेब यांचे कोर्टात
चौ.अर्ज नं.२४६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२६/१०/२०२१

श्री.संतोष संतराम काकडे
वय : ३९ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.के.५, रुम नं.१०४, मोराज रिवर–साईपार्क,
तक्का पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६ — अर्जदार
विरुद्ध
१) श्रीमती.आशा संतराम काकडे
वय : ५८ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.के.५, रुम नं.१०४, मोराज रिवर–साईपार्क,
तक्का पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६
२) श्री.सतीश संतराम काकडे
वय : ३६ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.एन–३, रुम नं.००३, मोराज कॉम्प्लेक्स, तक्का
पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६ — सामनेवाले

वरील अर्जदार श्री.संतोष संतराम काकडे रा.के.५, रुम नं.१०४, मोराज रिवर–साईपार्क, तक्का पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६

अर्जदार यांचे वडील आणि सामनेवाला क्र.१ यांचे पती व सामनेवाला क्र.२ यांचे वडील कै.संतराम बाबुराव काकडे हे दि.२६/०५/२०१९ रोजी एम.जी.एम. हॉस्पिटल कामोठे, पनवेल येथे मयत झाले असून सदर मयताच्या नावे असलेली मिळकत खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**बिल्डींग नं.के/५, रुम नं.१०४, मोराज कॉम्प्लेक्स, टाईप सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, प्लॉट नं.४४८, ४४९/२, तक्का पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, क्षेत्रफळ ३२९ चौ.फु.कारपेट (४७० चौ.फु.) सदर मिळकतीची एकूण किंमत रक्कम रु.३,७६,०००/– (अक्षरी रुपये तीन लाख शहात्तर हजार फक्त)**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी.

वरील पद्धतीने हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१३/१०/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

श्री.भाकरे सो.कोर्ट
प्रो.जमा.६–२५
अर्जदाराचे वकील
दिपाली रामदास गावंड
वकील उच्च न्यायालय

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.१५२५/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२१/१२/२०२१

१) श्रीमती.उषा चंद्रकांत घरत
वय : ४२ वर्षे, धंदा : गृहिणी
२) कु.भावेश चंद्रकांत घरत
वय : २१ वर्षे, धंदा :
३) कु.भावना चंद्रकांत घरत
वय : १९ वर्षे, धंदा : शिक्षण
४) कु.भाविका चंद्रकांत घरत
वय : १६ वर्षे, धंदा : शिक्षण
५) कु.भुमिका चंद्रकांत घरत
वय : १६ वर्षे, धंदा : शिक्षण
६) श्रीमती.हालीबाई उर्फ हालूबाई नामदेव घरत
वय : ८६ वर्षे, धंदा : गृहिणी
अर्जदार क्र.१ स्वतःकरिता व अर्जदार क्र.४ व ५ करिता अज्ञान पालनकर्ती आई
सर्व रा.पापडीचा पाडा, तळोजे मजकूर,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी कै.चंद्रकांत नामदेव घरत हे दि.३०/०८/२०२० रोजी मौजे : खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावले असून त्यांचे नावे खालील वर्णनाच्या मिळकती आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : तळोजे पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड**

| गाव | युनिट केस नं. | ॲवार्ड नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|---|
| तळोजे पाचनंद | ९५+१२१ (आय) | ३६६ | ५८ | ५ | ०–०५–० |
| | | | ५८ | १ | १–०७–० |
| तळोजे पाचनंद | ९५+१२१ | २३७ | ५९ | ४ | ०–११–१२ |
| | | | ६० | १ | ०–०४–० |
| | | | ६९ | १ ब | ०–१८–४ |
| | | | ७० | ४ | १–२१–४ |
| | | | ७० | ६ अ | ०–२३–८ |
| | | | ७० | १ | ०–३०–८ |
| तळोजे पाचनंद | १२१ (अ) | २०५ | ६३ | ० | १–३१–१२ |

कै.चंद्रकांत नामदेव घरत यांस अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहेत. सबब अर्जदार सदरचा अर्ज करीत आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाही असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

तारीख ८/११/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## स्कुटी चालकाचा अपघातात मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भरधाव वेगात असलेली स्कुटी रस्त्यावरील गतीरोधकाला आदळल्याने व गाडीवरील ताबा सुटून स्कुटी चालक रस्त्याच्या बाजूला असलेल्या कचरा कुंडीवर धडकल्याने झालेल्या दुर्घटनेत त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

अजय आवारे (३७) हा त्याच्या ताब्यातील स्कुटी घेवून रात्री उशिरा खारघर रेल्वे स्टेशन येथून सेक्टर १२च्या दिशेने भरधाव वेगाने जात असताना त्याला रस्त्यावरील गतीरोधक न दिसल्याने त्याची अ‍ॅक्टीव्हा गाडी गतीरोधकावर जोरात आदळली व त्याचा गाडीवरील ताबा सुटून तो बाजूला असलेल्या कचरा कुंडीवर जावून धडकला.

यात तो गंभीररित्या जखमी झाल्याने त्याला नजिकच्या रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले होते. परंतु उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला आहे.

## मोफत नेत्र तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल आणि चंद्रकला शशिकांत शेळके नगरसेविका पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमानाने मोफत नेत्र तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी अरुण भगत (पनवेल तालुका अध्यक्ष भारतीय जनता पार्टी), नगरसेविका चंद्रकला शशिकांत शेळके, शंकरा आय हॉस्पिटलचे मॅनेजर तथा ट्रस्टी डॉ. सचिन भूमकर, प्रभाग समिती ब सभापती समीर ठाकूर, नगरसेवक एकनाथ गायकवाड, भाजपा ओबीसी सेल सरचिटणीस दशरथ म्हात्रे, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, माजी सरपंच शशिकांत शनिवार शेळके, सचिन गायकवाड, शंकुनाथ भोईर, हरिश्चंद्र म्हात्रे व ग्रामस्थ मंडळ आसुडगांव उपस्थित होते.

९० लोकांनी या शिबीराचा लाभ घेतला. त्यामधून ३४ लोकांना मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया साठी हॉस्पिटलला रवाना करण्यात आले.

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# इतर मागासवर्गीय घटकांना न्याय देण्यास कटिबध्द : मंगेश कुडाळकर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

भारतीय संविधानाने समाजातील दुर्बल घटकांना सबल घटकांच्या बरोबरीने विकासाची संधी दिली आहे. याच अनुषंगाने इतर मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राज्य शासनाने काय उपाय योजना कराव्यात याचा अभ्यास व परिक्षण करुन याविषयीची माहिती दोन्ही सभागृहांना सादर करण्यास महाराष्ट्र विधान मंडळ इतर मागासवर्ग कल्याण समिती कटिबध्द आहे, असे प्रतिपादन इतर मागासवर्ग कल्याण समिती प्रमुख श्री.मंगेश कुडाळकर यांनी आज येथे केले.

महाराष्ट्र विधान मंडळ इतर मागासवर्ग कल्याण समिती दि.१० ते दि.१२ नोव्हेंबर २०२१ या तीन दिवसीय रायगड जिल्हा दौऱ्यावर आली असून जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात आयोजित बैठकीत ते बोलत होते.




यावेळी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय इतर मागासवर्ग कल्याण समितीचे पदाधिकारी विधानसभा सदस्य तथा समिती सदस्य श्री.दिपक केसरकर (सावंतवाडी मतदारसंघ), श्री.राजू कारेमोरे (तुमसर मतदारसंघ), डॉ. पंकज भोयर (वर्धा मतदारसंघ), श्रीमती मंजुळा गावित (साक्री मतदारसंघ), विधान परिषद सदस्य श्री.अभिजित वंजारी (नागपूर विभाग पदवीधर) आणि विधानमंडळ सचिवालयातील अधिकारी अवर सचिव (समिती) घ.ज्ञा.देबडवार, जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे, उपवनसंरक्षक आशिष ठाकरे, पनवेल महानगरपालिका आयुक्त गणेश देशमुख, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. पद्मश्री बैनाडे, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) सर्जे राव म्हस्के-पाटील, जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) स्नेहा उबाळे, उपायुक्त विशाल नाईक, तहसिलदार विशाल दौंडकर, सचिन शेजाळ हे उपस्थित होते.

या बैठकीत जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, रायगड, पनवेल महानगरपालिका, खोप-ोली, अलिबाग, महाड, पेण, रोहा, उरण, मुरुड जंजिरा, श्रीवर्धन,माथेरान व कर्जत नगरपरिषदा तसेच तळा, पोलादपूर, माणगाव, खालापूर नगरपंचायत येथील इतर मागासवर्गीय प्रवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्या भरती, बढती, आरक्षण, अनुशेषाबाबत व इतर कल्याणकारी योजना याबाबत संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करण्यात आली.

इतर मागासवर्गीय अधिकारी, कर्मचाऱ्यांबाबतीत कल्याणकारी योजना राबविताना तांत्रिक व प्रशासकीय कोणत्या अडचणी येतात, सर्व शासकीय कार्यालयांमध्ये इतर मागासवर्गीयांच्या कल्याणाच्या दृष्टीने नियमांनुसार बिंदू नामावली, रोस्टर अद्ययावत करण्यात आले आहे किंवा कसे, इतर मागासवर्गीय संवर्गातून अनुकंपा तत्वावरील नियुक्तीबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात आली आहे किंवा कसे अशा विविध प्रशासकीय बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी या समितीस अनुकंपा तत्वा-वरील नियुक्ती देताना संबंधित कुटूंबास येणाऱ्या प्रशासकीय अडचणींविषयी शासन स्तरावर मार्ग काढण्याविषयी विनंती केली.


# नेरळ-माथेरान रेल्वे सेवा सुरू करण्याबाबत रेल्वेच्या वरिष्ठांनाच सोयरसुतक नाही

## स्थानिकांच्या व्यवसायावर परिणाम : रेल्वेचे खाजगीकरण व्हावे नागरिकांची मागणी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान करांचे अर्थातच येथील लहानमोठ्या स्टॉल धारकांपासून,दुकानदार, रेस्टॉरंट चालक, सर्वसामान्य मोलमजुरी करणाऱ्या श्रमिक वर्गासह उचचभ्रू हॉटेल इंडस्ट्री या सर्वांनाच पर्यटनावर अवलंबून राहावे लागते परंतु बहुतांश पर्यटक हे माथेरान मिनिट्रेनच्या प्रवासासाठी येत असतात. अनेक वर्षे नेरळ माथेरान दरम्यान धावणारी मिनिट्रेन सेवा बंद करण्यात आल्यामुळे पर्यटकांना नाईलाजाने खाजगी मोटार वाहनाने अथवा स्वतः च्या मोटारीने यावे लागते.

दस्तुरी नाक्याजवळील अमन लॉज रेल्वे स्टेशन पासून गावात जाण्यासाठी शटल सेवा उपलब्ध आहे परंतु त्यात सुध्दा आता तीन बोगी द्वितीय श्रेणी साठी असल्याने केवळ नव्वद प्रवाशांना लाभ घेता येतो तर एक बोगी प्रथम श्रेणी असल्याने त्यात जेमतेम दहा ते पंधरा प्रवासी प्रवास करू शकतात त्यामुळे अनेकांना या शटल सेवेचे तिकीट सुध्दा उपलब्ध होत नाही. सुट्ट्यांच्या हंगामात मोठ्या प्रमाणावर पर्यटकांची गर्दी होत असून शटलच्या माध्यमातून चांगल्या प्रकारे उत्पन्न मिळत असताना या मार्गावर बोग्यांची संख्या वाढवली जात नाही. कर्मचारी वर्गाचा पगार सुध्दा कमी बोग्यांच्या संख्येमुळे प्राप्त होत नाही. तरी देखील रेल्वेच्या वरिष्ठांना याबाबत काहीएक सोयरसुतक दिसून येत नाही.त्यामुळे नेरळ माथेरान आणि अमन लॉज ते माथेरान दरम्यान जी शटल सेवा उपलब्ध आहे या गाड्यांचे खाजगीकरण केल्याशिवाय पर्याय नाही



असे स्थानिकांसह पर्यटकांमधून बोलले जात आहे. २००५ मध्ये अतिवृष्टीमुळे रेल्वेच्या मार्गावरील अनेक ठिकाणी दरडी कोसळल्या होत्या त्यानंतर रेल्वे मार्गाची दुरुस्ती केल्यानंतर मधल्या काळात ही सेवा सुरळीत सुरू होती त्यानंतर आजपर्यंत ही सेवा बंद करण्यात आली आहे

त्यामुळे पर्यटकांची संख्या रोडावली असून याचा इथल्या पर्यटनावर विपरीत परिणाम झालेला दिसून येत आहे.नुकताच रेल्वेचे व्यवस्थापक शलभ गोयल यांनी इथे धावती भेट दिली त्यावेळी त्यांनी फक्त रेल्वे स्टेशन मध्ये दुरुस्ती त्याचप्रमाणे अन्य सोयीसुविधा करणेबाबत स्थानिकांशी चर्चा केली होती नेरळ माथेरान या सेवेबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला नाही. आजपर्यंत करोडो रुपये या मार्गावर खर्च करण्यात आलेला आहे परंतु नेरळ माथेरान सेवा सुरू करण्याबाबत यांची मानसिकता दिसून येत नाही. दरवर्षी कोकण रेल्वेच्या मार्गावर पावसाळ्यात दरडी कोसळतात त्यावेळेस युद्धप-ातळीवर कामे पूर्ण करून ही सेवा सुरळीत चालू केली जाते. रेल्वेच्या अकार्यक्षम अधिकारी वर्गाला जर माथेरान मिनिट्रेन बाबतीत काहीएक स्वारस्य नसेल तर या मिनिट्रेनला टाटा ,रिलायन्स अथवा अन्य समूहाशी करार करून खाजगी पद्धतीने देण्यात यावी तेव्हाच या ठिकाणी पर्यटकांना उत्तम प्रकारे सेवा उपलब्ध होऊन इथल्या पर्यटनात वाढ होऊन सर्वानाच चांगल्या प्रकारे रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतात.

१९०७ साली सर आदमजी पिरभोय आणि अब्दुल हुसेन आदमजी पिरभोय या पितापुत्रांनी केवळ चार वर्षात अवघड वळणांच्या या कठीण मार्गावर स्वखर्चाने त्याकाळी सोळा लाख रुपये खर्च करून रेल्वे सुरू केली होती आणि आताचे अधिकारी वर्ग हे सर्व प्रकारच्या अत्याधुनिक यंत्रसामग्री उप-लब्ध असताना हेतुपुरस्सर दुर्लक्ष करीत आहेत ही लाजिरवाणी बाब असल्याचे बोलले जात आहे.

> अनेक वर्षांपासून या गावाशी एकप्रकारची नाळ जुळली गेली आहे. मिनिट्रेनचा प्रवास हाच इथे येण्याचा आमच्या कुटुंबातील सदस्यांचा एकमेव उद्देश असतो परंतु काही वर्षांपासून नेरळ माथेरान मिनिट्रेन बंद करण्यात आली आहे त्यामुळे आम्हाला नाईलाजाने खाजगी वाहनांचा आधार घ्यावा लागत आहे रेल्वे प्रशासनाने याबाबत लवकरच सुवर्णमध्य काढून ही सेवा पूर्वपदावर आणावी.
>
> **इंद्रजीत चॅटर्जी, पर्यटक नाशिक**

## अज्ञाताने चक्क इनोव्हा कार नेली चोरुन

**दै.रायगड नगरी । उतेखोल / माणगाव**

मंगळवार दि. ९ रोजी रात्री साडेआठ ते बुधवार दि. १० रोजी सकाळी नऊचाळीस चे सुमारास माणगांव येथील जमजम अपार्टमेंटच्या बाजुला असलेल्या रिकाम्या जागेत असलेली ग्रे रंगाची टोयोटो कंपनीची इनोव्हा कार क्रमांक एम.एच.०८/ एजी ०५३८ चेसी क्रमांक एमबीजे ११जेव्ही ४००७५३०८४६ इंजिन क्र. २केडीयु ७७०४२० अशा वर्णाची जुनी वापरातील किंमत अंदाजे पाच लाख रुपयांची इनोव्हा कार कोणीतरी अज्ञात चोरट्याने लंपास केली असल्याची फिर्याद शेती व्यवसाय करणारे इस्माईल महम्मद मुकादम वय ६५ राहणार वेश्री ता. मंडणगड जिल्हा रत्नागिरी यांनी माणगांव पोलिस ठाण्यात दिली आहे.

या घटनेबाबत कॉ. गुन्हा रजि. नंबर २४१/२०२१ भा. द. वि. सं. कलम ३७९ प्रमाणे माणगांव पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक अश्वनाथ खेडकर यांचे मार्गदर्शनात सहा. फौजदार वाटवे हे या गुन्ह्याचा अधिक तपास करीत आहेत.

# जय हनुमान कलामंचने जिंकली रसिकांची मने

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

जय हनुमान कलामौच तळवली तर्फे अष्टमी, ता.रोहे निर्मित रंगबहार या कार्यक्रमाने रसिक प्रेक्षकांची मनं जिंकून चांगलीच वाहवा मिळविली.

या रंगबहार कार्यक्रमाचे उद्घाटन सरपंच मंजूळा काटकर व सामाजिक कार्यकर्त्या गुलाब वाघमारे यांच्या हस्ते संपन्न करण्यात यावेळी मंडळाचे अध्यक्ष रमेश काटकर, उपाध्यक्ष गणेश वाघमारे, सचिव दीपक काटकर, कार्याध्यक्ष हनुमान काटकर, आदी मान्यवर उपस्थित राहणार होते. सालाबादप्रमाणे याही वर्षी रोहे तालुक्यातील खरबाचीवाडी येथे माता तुळजाभवानी उत्सव सोहळा मोठ्या धार्मिक वातावरणात विविध कार्यक्रमाने संपन्न करण्यात आला. यावेळी मंदिरात अभिषेक, सत्यनारायणाची महापूजा, पालखी सोहळा, महाप्रसाद तसेच समाजप्रबोधनपर पथनाट्य आदी कार्यक्रमांबरोबर जय हनुमान तळवली तर्फे अष्टमी यांची प्रस्तुती असलेल्या मराठी व हिंदी रेकॉर्डडानॅस या रंगबहार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात जय हनुमान कलामंच यांनी लोकगीते, लालणी, हिंदी व मराठी सुपरहिट गीते सादर करून तसेच कार्यक्रम प्रमुख हास्यविनोदी कलाकार नंदकुमार मरवडे यांनी सादर केलेली सुपरहिट मिमिक्री यामुळे रसिक प्रेक्षक बेहद खुश होऊन जय हनुमान कलामंचच्या सर्व कलाकारांचे जाहिररित्या कौतूक केले. या कार्यक्रमप्रसंगी महाराष्ट्र राज्य विधान परिषद आ.अनिकेत तटकरे यांनीही भेट देऊन ग्रामस्थांच्या या उपक्रमाचे जाहिररित्या कौतूक केले. तर या सोहळ्याचे यशस्वीतेसाठी ग्रामस्थ मंडळ, महिला मंडळ व तरूण मंडळ खरबाचीवाडी व वडाचीवाडी अधिक मोलाचे सहकार्य केले.



# रस्ता नसल्याने आदिवासी समाजाला घ्यावा लागतो झोळीचा आधार

**दै.रायगड नगरी । माथेरान**

कर्जत तालुक्यातील माथेरानच्या पायथ्याशी असलेल्या आदिवासी वाड्यांपर्यंत पोहचण्यासाठी वन विभाग रस्ता तयार करून देत नाही. त्यामुळे स्थानिक आदिवासी लोक आपली पायवाट श्रमदान करून तयार करतात. मात्र पावसाळ्यात श्रमदान करून बनवलेल्या रस्त्याचा मोठा भाग वाहून गेला आहे. दरम्यान,रस्ता सुस्थितीत नसल्याने वाहने ये जा करू शकत नाहीत आणि त्यामुळे आसलवाडी मधील गरोदर महिलेला डोली करून जुम्मापट्टी पर्यंत न्यावे लागले.

माथेरानच्या पायथ्याशी १२ आदिवासी वाड्या असून त्या आदिवासी वाड्या वन जमिनीवर वसल्या आहेत. वन विभागाच्या दली भूखंडावर उभ्या राहिलेल्या या आदिवासी वाड्या परिणती जाण्यासाठी रस्ता वन विभाग करू देत नाही आणि त्यामुळे आदिवासी वाड्यांमध्ये राहणाऱ्या लोक दरवर्षी श्रमदान करून रस्ता तयार करता. मात्र तो रस्ता दरवर्षी पावसाळ्यात वाहून जातो आणि त्यामुळे पावसाळ्यानांतर कोणत्याही प्रकारची वाहने आदिवासी वाड्यांपर्यंत जाऊ शकत नाहीत.जुम्मापट्टी पासून धनगर वाडा ते आसलवाडी हा रास्ता वाहून



गेला असून असालवाडी या ६० घरांची लोकवस्ती आहे. परंतु या आदिवासी वाडीमध्ये जाणार रस्ता हा श्रमदानातून बनवलेला रस्ता आहे, हा रस्ता पूर्णपणे वाहून घेतलेला आहे, यामुळे येथे वाहने जाऊ शकत नाही.

असालवाडी मधील बेबी गणपत दरवडा या २२ वर्षीय विवाहित महिलेला बाळंतपणासाठी आज १० ऑक्टोबर रोजी सकाळी नेरळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आणायचे होते. बेबी दरवडा यांच्या पोटात कळा वाढू लागल्याने स्थानिक ग्रामस्थ आणि त्यांचे कुटुंबीय यांनी अखेरचा पर्याय म्हणून सकाळी सात वाजता चादरीच्या कपड्याची डोली केली आणि त्या डोलीतुन गरोदर महिलेचा असालवाडी ते जुम्मापट्टी असा प्रवास सुरु झाला. साधारण तीन किलोमीटरचे यानंतर गरोदर महिलेला आंत सहा जणांनी जुम्मापट्टी गाठले आणि बेबी दरवडा यांना रिक्षातून नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले. त्या महिलेला गणपत दरवडा, काशिनाथ दरवडा, महेश सांबरी, नारायण पारधी, संदीप सांबरी यांनी त्या गरोदर महिलेला डोली मधून आणले.

आदिवासी कार्यकर्ते आतापर्यंत सात गरोदर महिलांना आणि अन्य वृद्ध यांना डोली करून माथेरान रस्त्यापर्यंत आणावे लागले आहे.त्यात सात अशा घटना होत असल्याने कर्जत तहसील कार्यलया आणि अन्य ठिकाणी रस्त्याच्या मागणीसाठी उपोषणे केली आहेत. मागील महिन्यात याच ग्रामस्थांनी नेरळ- माथेरान घाटरस्ता अडवला होता. तरीदेखील शासनाकडून केवळ आश्वासने मिळत असल्याने आम्ही ग्रामस्थ हैराण आहेत.

# एसटीच्या संपाला मनसेचा पाठींबा

**दै.रायगड नगरी । पेण**

एसटी कर्मचा-यांचा संप सुरू असून या संपाला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पाठिंबा दिला एसटी कर्मचाऱ्यांची रास्त मागणी आहे,कमी पगारात देखील येथील कर्मचारी काम करीत आ त्यांच्या या मागणीला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने जाहीर पाठिंबा दिला असल्याने पेण एसटी आ-गार चा संप असलेल्या ठिकाणी मनसेच्या कार्यकर्त्यांनी पोहोचून पक्षाच्या आदेशा प्रमाणे एसटी कर्मचा-यांना पांठीबा दिला.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशाने व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे .शिरीष सावंत व रायगड जिल्हा अध्यक्ष जितेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एस.टी कर्मचारी, पेण रायगड आगार यांच्या वतीने पुकारलेल्या बेमुदत संपाला मनसे पेण विधानसभेच्या वतीने पाठिंबा दिला.



एस. टी. महामंडळाचे महाराष्ट्र राज्य शासनात विलिनीकरण होण्याकरिता पुकारलेल्या बेमुदत संपाला मनसेच्या पेण विधानसभेच्या सर्व पदाधिकारी आणि महाराष्ट्र सैनिकांनी पाठिंबा देत, सर्व रायगड वर्कशॉप एस. टी कर्मचारी बांधव आणि पेण डेपो एस. टी कर्मचारी यांची विचारपूस करण्यात आली तसेच कर्मचारी बांधवांच्या न्याय हक्कासाठी सदैव महाराष्ट्र नवनिर्माण सेना, पेण विधानसभा धावून येईल असे अश्वासन देण्यात आले.

सदर पांठिब्याचे निवेदन देते वेळी मनसेच्या रायगड जिल्हा महिला अध्यक्षा सपना देशमुख, उपजिल्हा अध्यक्षा छायाता शिंदे, पेण तालुका सचिव मनोहर पाटील, माजी राज्य उपाध्यक्ष रोजगार व स्वयंरोजगार मनसे संदिप ठाकुर, मनविसे रायगड जिल्हा सचिव रुपेश पाटील, पेण शहर अध्यक्ष नितीन पाटील, पेण शहर अध्यक्षा निकिता पाटील, पेण तालुका सचिव रेखा तांडेल, पेण शहर उपाध्यक्ष सुदेशभाऊ संसारे, प्रकाश मनोरे, हमरापुर विभाग अध्यक्ष हनुमान नाईक, पेण विभाग अध्यक्ष अभिजीत चव्हाण, आदिसह मनसेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांना जातीचे दाखले वाटप करण्यासाठी समाज कल्याण विभाग अभियान राबवणार : डॉ.प्रशांत नारनवरे

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

विद्यार्थ्यांना जातीचे दाखले मिळण्यास अनेक अडचणी येतात. याकरिता सामाजिक न्याय विभागाच्या वसतीगृह, निवासी शाळा, समाजकार्य महाविद्यालय अनुदानित वसतिगृह तसेच जिल्हा परिषदेच्या महानगरपालिका व नगरपालिकेच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना जा-तीचे दाखले त्वरीत मिळावे यासाठी समाज कल्याण अधिकारी यांनी ग्रामीण व शहरी भागात शिबीरे घेवून जातीचे दाखले मिळवून देण्यासाठी अभियान सुरु करावे असे निर्दे श समाज कल्याण विभागाचे आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांनी दिले. कोकण भवन येथे (दि.०९ नोव्हेंबर २०२१) रोजी झालेल्या मुंबई विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

विद्यार्थ्यांना जातीचे दाखले मिळण्यास अडचणी येत असतात. त्यामुळे जे विद्यार्थी समाज कल्याण विभागाच्या अनुदान शाळा, शासकीय वसतिगृह, अनुदानित वसतिगृह, समाजकार्य महाविद्यालय इत्यादी मध्ये शिक्षण घेत आहेत. त्यांना व इतर विद्यार्थ्यांना जातीचे दाखले त्वरीत मिळण्यासाठी संबंधित जिल्हयाच्या सहाय्यक आयुक्त, जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी कॅम्प आयोजित करावेत. जेणेकरुन संबंधित विद्यार्थ्यांना जातीचे दाखले त्वरीत मिळण्यास मदत होईल. सामाजिक न्याय विभागातर्फे विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. परंतु या योजना १०० टक्के लाभार्थ्यापर्यंत पोहोचत नाहीत. यासाठी सामाजिक न्याय विभागातर्फे वस्ती संपर्क अभियान हा नवीन उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाअंतर्गत प्रत्येक शासकीय अधिकाऱ्याने आठवडयातून एक दिवस ग्रामीण व शहरी भागातील वस्तीमध्ये जाऊन लोकांशी संपर्क साधने अभिप्रेत आहे. तेथे जाऊन संबंधित अधिकाऱ्यांनी मुलांच्या शिक्षण व आरोग्याचे आरोग्य विषयक योजनेविषयी माहिती देणे, विविध योजनांच्या लाभार्थ्यांचे फॉर्म भरुन घेणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे हे अभिनत आहे. लवकरच हा उपक्रम सुरु करण्यात येणार आहे व शासनाच्या इतर विभागाच्या विभागांना यामध्ये सहभागी करुन घेण्यात येणार आहे असेही यावेळी श्री. नारन-वरे यांनी सांगितले. या बैठकीत सामाजिक न्याय विभागामार्फत मुंबई विभागात सुरु असलेल्या विविध योजनांचा आढावा घेण्यात आला. या बैठकीत सहा आयुक्त भारतकुमार केंद्रे, उपायुक्त रविंद्र कदम पाटील, प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे इत्यादी अधिकारी उपस्थित होते.